सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोन वेळा सन्मानित
मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे 'स्वच्छ कॅम्पस रँकिंग 2019' मानांकन प्राप्त

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)

'ज्ञानगंगोत्री', गोवर्धन, गंगापूर धरणाजवळ, नाशिक - 422 222

वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखा

सहकार व्यवस्थापन पदविका (P08) शिक्षणक्रम माहितीपुस्तिका

शैक्षणिक वर्ष - जून २०२५

विद्यापीठ गीत



एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना ।
चिरंतन ज्ञानाची साधना ।
ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ।। धृ ।।

ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी ।
तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी ।
ज्ञानच देउळ, ज्ञानच दैवत, प्रगतीच्या पूजना ।। १।।

नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे ।
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे ।
मुक्त करिल तो परंपरेच्या बंदिघरातुन मना ।। २ ।।

हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे ।
न्यायनीतीचे पाऊल जेथे भेदाशी ना अडे ।
जे जे मंगल पावन त्याची जेथे आराधना ।। ३ ।।

कुसुमाग्रज

निर्मिती

श्री. विलास बधान
प्रमुख (प्र.), ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

© २०२५, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

■ **प्रथम प्रकाशन** : जानेवारी २०२५
■ **प्रकाशक** : श्री. दिलीप भरड, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

AC24-190 (P08)/Shardul

सहकार व्यवस्थापन पदविका (P08) शिक्षणक्रम : माहितीपुस्तिका

अनुक्रमणिका

१. विद्याशाखेचा परिचय ४

२. सहकार व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाविषयी ४

- २.१ शिक्षणक्रमाची संरचना
- २.२ प्रवेश पात्रता
- २.३ शिक्षणक्रम शुल्क
- २.४ कालावधी
- २.५ माध्यम
- २.६ मूल्यमापन प्रक्रिया
- २.७ श्रेयांक (अभ्यासतासांचे परिमाण)
- २.८ विद्यार्थ्यांना महत्त्वाची सूचना
- २.९ पुर्नपरिक्षार्थींसाठी सूचना

३. Academic Bank of Credits ID तयार करण्याबाबतची सूचना ७

४. विभागीय केंद्रे ८

५. अभ्यासकेंद्रे ९

६. विशेष सूचना/संपर्कासाठी १०

७. **परिशिष्टे** ११

परिशिष्ट १ : Online Admission Process flow for Candidate NOT having 16 Digit P.R.N.
Online Admission Process flow for Candidate who have 16 Digit P.R.N.

परिशिष्ट २ : उमेदवार/अध्ययनार्थी करारनामा
Candidate/Student Agreement at the time of Admission

परिशिष्ट ३ : गरीब विद्यार्थी सहाय्य योजना नियमावली

परिशिष्ट ४ : University Grants Commission Resolution (2004)

परिशिष्ट ५ : G.R. of Equivalency for 10th and 12th

परिशिष्ट ६ : एकापेक्षा अधिक शिक्षणक्रमांना प्रवेश

परिशिष्ट ७ : G.R. of Equivalency

परिशिष्ट ८ : Letter of Recognition from UGC

परिशिष्ट ९ : विद्यार्थी सहायता आणि विद्यार्थी कल्याण योजना

परिशिष्ट १० : Student Corner

१. विद्याशाखेचा परिचय

वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा ही मुक्त विद्यापीठाची एक महत्त्वाची विद्याशाखा आहे. विद्यापीठाच्या स्थापनेपासून ही विद्याशाखा कार्यरत आहे. सन १९९१ पासून भारताने मुक्त धोरणाचा स्वीकार केल्यानंतर देशात तसेच आंतरराष्ट्रीय क्षेत्रात प्रचंड घडामोडी झाल्या. माहिती, तंत्रज्ञान आणि संगणक युगात पारंपरिक व्यापार पद्धतीला फाटा देऊन इंटरनेट, ई–कॉमर्स अशा संज्ञा रूढ झाल्या. त्यानुसार शिक्षणपद्धतीच्या तंत्रज्ञानातही बदल करावा लागला. आभासी शिक्षणपद्धती, सीडीच्या माध्यमातून विविध विषयांची माहिती करून देणे, इंटरनेटवरून आवश्यक ते संदर्भ विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे, उपग्रहाद्वारे शिक्षण तसेच अद्ययावत तंत्रज्ञानाने युक्त अशा माहितीचे स्रोत विद्यार्थ्यांना प्राप्त करून देणें या सारख्या सोई विद्यार्थ्यांना उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनाच्या क्षमतेत निश्चितच वाढ झाल्याचे दिसून येते आणि हे कार्य वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेने यशस्वीपणे पार पाडले आहे.

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेत दोन पदव्युत्तर शिक्षणक्रम, एक पदवी शिक्षणक्रम आणि तीन पदविका शिक्षणक्रम चालविले जातात. या शिक्षणक्रमात एम.बी.ए. (AICTE ची मान्यता प्राप्त), एम.कॉम. (NEP2020), बी.कॉम., सहकार व्यवस्थापन पदविका, सहकार व्यवस्थापन पदविका (बँकिंग), डिप्लोमा AHTTM, इत्यादी शिक्षणक्रमांचा समावेश आहे.

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेची उद्दिष्टे

(१) सहकार क्षेत्रासाठी आवश्यक मनुष्यबळ तयार करणे, मानवी हक्क मूल्य प्रणाली, सामाजिक आणि सांस्कृतिक वातावरणाशी संबंधित विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारी, वचनबद्धता, जाबाबदारीची भावना जागृत करणे.

(२) व्यापार–उद्योग, व्यवस्थापनशास्त्र, इत्यादी क्षेत्रांतील व्यवहारज्ञान प्राप्त करून बहुश्रुतता वाढविणे. कार्यालये, संस्था, कंपन्या ह्यांच्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून देणे.

(३) सातत्याने होणाऱ्या सुधारणा/बदल यांसाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनविणे. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजगता विकास गुण वृद्धिंगत करणे.

(४) संशोधन कार्यातून वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र प्रगल्भ करणे. प्रसिद्धीच्या माध्यमातून विविध शिक्षणक्रम सर्वदूर पसरविणे.

(५) व्यवस्थापक होऊ पाहणाऱ्यांना ज्ञानार्जनाच्या संधी उपलब्ध करून देणे. समृद्ध जीवन जगण्यासाठी ज्ञानात्मक आधार देणे.

२. सहकार व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाविषयी

'सहकार व्यवस्थापन पदविका' हा शिक्षणक्रम एक विशेष शिक्षणक्रम आहे जो विद्यार्थ्यांना सहकारी व्यवस्थापन क्षेत्रातील सर्वसमावेशक ज्ञान आणि कौशल्ये प्रदान करण्यासाठी तयार केलेला आहे. सहकारी अशा संस्था आहेत ज्या सामान्य आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी एकत्र येतात. संपूर्ण कोर्समध्ये, विद्यार्थी सहकाराचा ऐतिहासिक विकास, शाश्वत विकासातील त्यांची भूमिका आणि एकूण अर्थव्यवस्थेतील त्यांच्या योगदानाबद्दल शिकतात. त्यांना स्वयंसेवी आणि मुक्त सदस्यत्व, लोकशाही सदस्य नियंत्रण, सदस्य आर्थिक सहभाग, स्वायत्तता आणि शिक्षण यांसारख्या सहकारी तत्त्वांची समज मिळते.

हा कोर्स सहकार व्यवस्थापनाच्या विविध पैलूंवर लक्ष केंद्रित करतो, ज्यामध्ये सहकाराची तत्त्वे आणि मूल्ये, सहकारी प्रशासन, सहकारी कायदे आणि नेतृत्व विकास सहकारी जमाखर्च, बँकिंग व लेखापरिक्षण यांचा समावेश आहे. हे विद्यार्थ्यांना एक सहकारी उपक्रम प्रभावीपणे व्यवस्थापित करण्यासाठी आणि चालविण्यासाठी आवश्यक साधने आणि तंत्रांसह सुसज्ज करते.

सहकार व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रमाची उद्दिष्टे (Program Outcomes)

(१) या शिक्षणक्रमातून स्वयंरोजगार प्राप्त करण्यासंबंधीच्या संधी उपलब्ध होतील. सहकारी संस्थांना लागणारे प्रशिक्षित मनुष्यबळ प्राप्त होईल.

(२) सहकार व्यवस्थापन पदविका पूर्ण केल्यावर सहकारी व्यवस्थापक, सहकारी सल्लागार, सहकारी विकास अधिकारी आणि सहकारी प्रशिक्षक यांसारख्या सहकारी संस्थांमध्ये विविध भूमिकांमध्ये करिअर करू शकतात.

(३) सर्व प्रकारच्या मीडिया/मार्केटिंग/व्यवस्थापन कंपन्या जसे की, जाहिरात एजन्सी, सल्लागार यांसारख्या क्षेत्रात करिअर करू शकतात.

(४) सहकार व्यवस्थापन पदविका विद्यार्थ्यांना खरोखर मजबूत नेतृत्त्व कौशल्ये विकसित करण्यास मदत करते.

२.१ शिक्षणक्रमाची संरचना

(अ) सहकार व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम

शिक्षणक्रम संकेतांक P08

'सहकार व्यवस्थापन पदविका' हा शिक्षणक्रम एकूण ४० श्रेयांकांचा आहे. या शिक्षणक्रमात अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

(१) (MGM-218) सहकार : तत्त्वे आणि कार्यपद्धती - 8 श्रेयांक
(२) (MGM-219)सहकारी व्यवस्थापन व प्रशासन - 8 श्रेयांक
(३) (MGM-220)सहकारी कायदा व इतर कायदे - 8 श्रेयांक
(४) (MGM-221) सहकारी जमाखर्च, बँकिंग व लेखापरीक्षण - 8 श्रेयांक
(५) (MGM-222) स्थिती अभ्यास व तोंडी परीक्षा - 8 श्रेयांक

अभ्यासक्रम

सहकार व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम

शिक्षणक्रम संकेतांक P08

(MGM 218) सहकार : तत्त्वे आणि कार्यपद्धती

पुस्तक १ : सहकार : इतिहास व तत्त्वे

पुस्तक २ : सहकारी अर्थव्यवस्था व कार्यपद्धती

पुस्तक ३ : सहकारी कृषी पतपुरवठा, प्रक्रिया व पणन व्यवस्था

पुस्तक ४ : कृषीपूरक उद्योग आणि नागरी सहकारी संस्था

(MGM 219) सहकारी व्यवस्थापन व प्रशासन

पुस्तक १ : व्यवस्थापन तत्त्वे व कार्य

पुस्तक २ : सहकारी व्यवस्थापन

पुस्तक ३ : सहकारी प्रशासन भाग – १

पुस्तक ४ : सहकारी प्रशासन भाग – २

(MGM 220) सहकारी कायदा व इतर कायदे

पुस्तक १ : महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ भाग – १

पुस्तक २ : ९७ वी घटना दुरूस्ती व महाराष्ट्र सहकारी संस्था सुधारणा अधिनियम २०१३

पुस्तक ३ : सहकारी संस्थांची उपविधी

पुस्तक ४ : सहकारी संस्थांच्या संबंधित अन्य कायदे

(MGM 221) सहकारी जमाखर्च, बँकिंग व लेखापरीक्षण

पुस्तक १ : सहकारी संस्थांतील हिशेबाची व अन्य पुस्तके भाग –१

पुस्तक २ : सहकारी संस्थांतील हिशेबाची व अन्य पुस्तके भाग – २

पुस्तक ३ : सहकारी बँकिंग

पुस्तक ४ : सहकारी लेखापरीक्षण

(MGM 222) स्थिती अभ्यास

पुस्तक १ : सहकारी संस्था : निवडक संस्थांचा स्थिती अभ्यास

२.२ प्रवेश पात्रता

खालीलपैकी कोणतीही एक पात्रता पूर्ण असणाऱ्या व्यक्ती

(१) कोणत्याही शाखेचा पदवीधर.
किंवा

(२) १२वी अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण आणि नोंदणीकृत सहकारी संस्थेतील ३ वर्षे कामाचा अनुभव.
किंवा

(३) अनुभव नसल्यास मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा आदेश क्र. अेडीएम/२–अे/सेक्शन ७४(१)/१९९६ दि.६/८/१९९६ अन्वये सहकारी संस्थांमधील अधिकारी/सेवकांनी जीडीसी ॲण्ड ए / एच.डी.सी.एम. / डी.सी.एम. / किंवा सदर आदेशात नमूद करण्यात आलेली अन्य शैक्षणिक अर्हता धारण केली असेल असा विद्यार्थी.
किंवा

(४) एस. एस. सी. किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण आणि नोंदणीकृत सहकारी संस्थेतील ५ वर्षे कामाचा अनुभव किंवा अनुभव नसल्यास वरील क्र. (३) मध्ये दर्शविलेल्या मा. सहकार आयुक्त यांच्या आदेशानुसार.

सदर माहितीपुस्तिकेत शैक्षणिक अर्हतेची माहिती देण्यात आली असून ती आपण पाहावी.

विशेष सूचना

(१) प्रवेश–अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडणे अत्यंत आवश्यक आहे.

(अ) शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रमाणित सत्यप्रत (Attested Photo Copy)

(आ) शैक्षणिक पात्रतेबाबतच्या गुणपत्रकांच्या प्रमाणित सत्यप्रत

(२) १०वी किंवा १२वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी सहकारी संस्थेतील कामाचा अनुभव असल्याचा दाखला सक्षम अधिकाऱ्याच्या सही शिक्क्यानिशी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

(३) एस.एस.सी. किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण आणि जीडीसी ॲण्ड ए किंवा तत्सम पात्रता धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी गुणपत्रकांच्या प्रमाणित सत्यप्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

(४) विद्यार्थ्यांनी प्रवेश–अर्जासोबत कोणत्याही प्रमाणपत्राची मूळ प्रत जोडू नये. जोडल्यास विद्यापीठ सदर प्रत / प्रती परत पाठविणार नाही व या संदर्भात पत्रव्यवहार केला जाणार नाही.

(५) वरील पात्रताधारक विद्यार्थी इतरत्र शिक्षण घेत असतानाही ह्या शिक्षणक्रमास प्रवेश घेऊ शकतो. उदाहरणार्थ, डी.एड., ए.टी.डी., एल.एल.बी., इत्यादी शिक्षणक्रम चालू असताना सहकार व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेता येईल.

२.३ शिक्षणक्रम शुल्क –

या शिक्षणक्रमाचे एकूण शिक्षणक्रम शुल्क रु.५५२८/– (पाच हजार पाचशे अठ्ठावीस रुपये मात्र) आहे. त्याची विगतवारी पुढीलप्रमाणे –

विद्यापीठ शुल्क	रु. ४५२८=००
अभ्यासकेंद्र शुल्क	रु. १०००=००
एकूण शिक्षणक्रम शुल्क	**रु. ५५२८=००**

संवैधानिक शुल्क (Mandatory Fees)

अ.क्र.	शुल्काचे शीर्षक	शुल्क
१	नोंदणी शुल्क	२००
२	पात्रता शुल्क	१००
३	पदविका समारंभ शुल्क	४५०
४	ओळखपत्र शुल्क	१०
४	माहितीपुस्तिका	५०
५	ई-सुविधा/ई-सर्व्हिसेस	७०
६	कुलपती ऑफिस इव्हेंट शुल्क	३८
७	क्रीडा शुल्क	५०
८	विद्यार्थी कल्याण शुल्क	५०
९	माजी विद्यार्थी शुल्क	१०
	एकूण	**१०२८**

शिक्षण व परीक्षा शुल्क

(अ) विद्यापीठ शुल्क	२६००
(ब) अभ्यासकेंद्र शुल्क	१०००
(अ) + (ब)	**३६००**
परीक्षा शुल्क	९००
संवैधानिक शुल्क	१०२८
एकूण शिक्षणक्रम शुल्क रुपये	**५५२८**

शिक्षणक्रम शुल्क भरण्यासंबंधी सूचना :

(१) विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्रावर कोणतेही शुल्क जमा करावयाचे नाही. एकूण शिक्षणक्रम शुल्क रु.५५२८/- विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने विद्यापीठाच्या अधिकृत बँक खात्यात जमा करावयाचे आहे. ऑनलाईन पद्धतीशिवाय अन्य कोणत्याही पद्धतीने रक्कम स्वीकारली जाणार नाही.

महत्त्वाची सूचना : विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयानुसार, अंध व तृतीयपंथी विद्यार्थी तसेच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य यांना नाममात्र नोंदणीशुल्क रुपये २००/- भरून प्रवेश घेता येईल.

२.४ कालावधी

मुक्त शिक्षणपद्धतीत विद्यार्थी काम करता करता शिक्षण घेत असल्यामुळे अध्ययन-कालावधीबाबत लवचीक धोरण ठेवण्यात आले आहे. त्यामुळे एका वर्षात करावयाचा अभ्यास विद्यार्थी आपल्या सोयीने ते वर्ष संपल्यानंतरही करू शकतो. म्हणून सहकार व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम एक वर्षाचा असला तरी विद्यार्थ्यांस तो आपल्या सोयीने प्रवेश घेतल्यापासून दोन वर्षांपर्यंत पूर्ण करण्याची मुभा देण्यात आली आहे. अभ्यास पूर्ण झाल्याची खात्री झाल्यावर परीक्षा देता येण्याची स्वायत्तता विद्यार्थ्याला येथे देण्यात आली आहे.

२.५ माध्यम

सर्व अभ्यासक्रमांसाठी मराठी माध्यम राहील. या अभ्यासक्रमांची पाठ्यपुस्तके, श्रवणफिती, चित्रफिती, अभ्यासक्रमांचे मार्गदर्शन, गृहपाठ, वर्गाचाचणी व अंतिम परीक्षेच्या प्रश्नपत्रिका मराठी भाषेतून राहतील.

काही विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेता विद्यार्थ्यांना इंग्रजी किंवा हिन्दी भाषेत उत्तरे लिहिता येतील. मात्र सर्व प्रश्नांची उत्तरे एकाच भाषेत (इंग्रजी अथवा हिन्दी) लिहिणे अनिवार्य आहे.

२.६ मूल्यमापन प्रक्रिया

या शिक्षणक्रमासाठी विद्यार्थ्यांचे मूल्यमापन तीन पद्धतींनी करण्यात येईल.

(१) अंतर्गत मूल्यमापन,
(२) स्थिती अभ्यास व तोंडी परीक्षा आणि
(३) अंतिम परीक्षा.

अंतर्गत मूल्यमापन

उपर्युक्त शिक्षणक्रमासाठी गृहपाठ व MGM 221 साठी **संगणक प्रात्यक्षिक किंवा गृहपाठ** असेल.

(अ) गृहपाठ

(१) सहकार व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमातील MGM218, MGM219, MGM220 आणि MGM221 या चारही अभ्यासक्रमासाठी प्रत्येकी २० गुणांचे गृहपाठ विद्यार्थ्यांना देण्यात येतील.

गृहपाठाचे प्रश्न विद्यापीठाच्या मूल्यमापन विभागाकडून पाठविण्यात येतील. किंवा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील. सूचनेत दिलेल्या तारखेच्या आत लेखी अभ्यास जमा करणे आवश्यक आहे. यासाठी प्रश्नसंच मुख्यालयातून पाठविण्यात येतील. विद्यार्थ्यांनी गृहपाठ पूर्ण केल्यानंतर त्यांचे परीक्षण अभ्यास केंद्रावरील संमंत्रकांकडूनच करण्यात येईल. **ज्या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतला असेल त्याच वर्षात गृहपाठ पूर्ण करणे अपेक्षित असून त्यासाठी विद्यार्थ्यांना पुन्हा संधी देण्यात येणार नाही.**

(आ) स्थिती अभ्यास व तोंडी परीक्षा (MGM 222)

उपयुक्त शिक्षणक्रमांसाठी ठरवून दिलेल्या किंवा विद्यार्थ्यांनी निवडलेल्या एखाद्या सहकारी संस्थेचा स्थिती अभ्यास (Case Study) विद्यार्थ्यांना करावा लागेल. त्यासाठी संबंधित संस्थेला प्रत्यक्ष भेट देणे, त्यांच्याकडून माहिती मिळवून संस्थेच्या वार्षिक अहवालाचे मूल्यमापन करणे, इत्यादी बाबतीत अभ्यास करून तो केंद्रसंयोजकाकडे विहित मुदतीत सादर करावा लागेल.

ज्या संस्थेचा स्थिती अभ्यास केला असेल त्या संस्थेच्या सक्षम अधिकाऱ्याकडून उपस्थितीबाबतचा दाखला स्थिती

अभ्यासासोबत जोडणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी केंद्रसंयोजकाकडे स्थिती अभ्यासाचा अहवाल सादर करावा. स्थिती अभ्यासाचे मूल्यमापन विद्यापीठाकडून करण्यात येईल. यासाठी ७५ गुण ठेवण्यात आले आहेत.

वर्षाच्या शेवटी विद्यार्थ्यांची विद्यापीठ नामनिर्देशित करेल अशा सक्षम अधिकाऱ्यांकडून तोंडी परीक्षा घेण्यात येईल. त्यासाठी २५ गुण ठेवण्यात आले आहेत. तोंडी परीक्षेत सर्व अभ्यासक्रमांवर आधारित तसेच स्थिती अभ्यास यावर प्रश्न विचारण्यात येतील. याप्रमाणे स्थिती अभ्यास आणि तोंडी परीक्षा यांचे अनुक्रमे ७५+२५=१०० पैकी गुण देण्यात येतील.

अंतिम मूल्यमापन

प्रत्येक अभ्यासक्रमाची १०० गुणांची ३ तास वेळ असणारी अंतिम परीक्षा घेण्यात येईल. साधारणत: अंतिम परीक्षा मे महिन्यात असेल. अंतिम परीक्षेचे स्वरूप पुढीलप्रमाणे –

(१) प्रश्नपत्रिका ही एकूण ८० गुणांची असून त्यामध्ये मुख्य ५ प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नामध्ये ५ उपप्रश्न दिले जातील. कोणतेही ४ प्रश्न सोडवावयाचे आहेत. याप्रमाणे प्रश्नपत्रिकेत एकूण ४ प्रश्न त्यामध्ये एकूण २० उपप्रश्न असतील त्यापैकी विद्यार्थ्याने एकूण १६ उपप्रश्न सोडवावयाचे आहेत.

सूचना

(१) प्रत्येक अभ्यासक्रमात स्वतंत्रपणे **उत्तीर्ण होण्यासाठी किमान ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य राहील.**

(२) MGM 222 या अभ्यासक्रमात ७५ पैकी व २५ पैकी मिळालेल्या गुणांची बेरीज करण्यात येईल. स्थिती अभ्यास व तोंडी परीक्षा ह्या मूल्यमापनाच्या घटकात एकत्रितपणे उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. उत्तीर्ण होण्यासाठी किमान ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य राहील.

(३) MGM 221 या अभ्यासक्रमाची प्रश्नपत्रिका मराठी तसेच इंग्रजी माध्यमातून असेल.

(४) सर्व अभ्यासक्रमात मिळालेल्या गुणांची बेरीज करून विद्यार्थ्यांस प्रतिशत गुण दर्शविण्यात येतील.

२.७ श्रेयांक (अभ्यासतासांचे परिमाण)

सामान्यत: एका अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याला ३० ते ३५ घड्याळी तासांचा वेळ लागतो. मुक्त शिक्षणपद्धतीत या अध्ययन तासांचे मापन 'श्रेयांक'च्या परिमाणात केले जाते. ३० ते ३५ अध्ययन तासांचा अभ्यास म्हणजे १ श्रेयांक. या अभ्यासात अध्ययन पुस्तकांचे वाचन, टिपणे काढणे, मनन–चिंतन करणे, प्रश्नोत्तरे लिहिणे, संपर्कसत्रातील मार्गदर्शन, इत्यादींचा समावेश आहे.

सामान्यत: आठ श्रेयांकांचा म्हणजेच २४० ते २८० अध्ययन तासांचा एक अभ्यासक्रम असतो. पदविका परीक्षेसाठी एकूण ३२ ते ४८ श्रेयांकांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो.

२.८ विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची सूचना

विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या शिक्षणक्रमाची छापील स्वयं–अध्ययन साहित्य प्रवेश घेतलेल्या अभ्यास केंद्राहून अंतिम लेखी परिक्षेपूर्वी घेऊन जावे. परीक्षा झाल्यानंतर आपला छापील स्वयंअध्ययन साहित्यावर कोणताही हक्क राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

विद्यार्थ्यांनी http://ycmou.digitaluniversity.ac आणि www.ycmou.ac.in या संकेतस्थळावर pdf स्वरूपात असलेली सदर पुस्तके अभ्यासावीत.

२.९ पूर्नपरीक्षार्थीसाठी सूचना

- जे विद्यार्थी एका किंवा अनेक विषयांत अनुत्तीर्ण/ अनुपस्थित राहिल्यास त्यांना पुढील परिक्षा सत्रांत पुनःपरीक्षार्थी अर्ज व शुल्क भरून विषय उत्तीर्ण करता येतील. सदर शुल्क खालीलप्रमाणे

अ.क्र.	तपशील	शिक्षणक्रम शुल्क
१	प्रमाणपत्र/पदविका/पदवी (व्यावसायिक/तांत्रिक/सायन्स वगळून)	रु. १८० प्रती पेपर
२	पदव्युत्तर पदवी आणि सर्व शिक्षणक्रम पदवी व्यावसायिक/तांत्रिक/सायन्सचे सर्व शिक्षणक्रम लेखी परीक्षा	रु. २०० प्रती पेपर
३	प्रात्यक्षिक/ मौखिक परीक्षा (viva-voce) **प्रात्यक्षिक/स्टुडीओ वर्क /टर्म वर्क–प्रकल्प / मौखिक –**	रु. २२० रु. ३३०
४	मार्कशीट शुल्क	रु. १००
५	विलंब शुल्क	रु. १००
६	अतिविलंब शुल्क	रु. ५००

सुचना : सदर परीक्षा पुनःपरीक्षा शुल्कात विद्यापीठाच्या निर्णयानुसार बदल होऊ शकतो.

३. Academic Bank of Credits ID तयार करण्याबाबतची सूचना

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार आपणास Academic Bank of Credits ID तयार करणे अनिवार्य आहे. आपण प्राप्त केलेले प्रमाणपत्र, पदविका, पदवीची माहिती Digi Locker (ABC-NAD) वर भरावी लागणार आहे. त्याशिवाय इतर अभ्यासक्रमासाठी क्रेडीट ट्रान्सफर करता येणार नाही. आपणास Academic Bank of Credits ID नोंदणी http://www.abc.gov.in या पोर्टलवर करता येईल किंवा आपल्या विद्यापीठाच्या www.ycmou.ac.in या वेबसाइटला भेट द्या. या वेबसाइटवरील student zone या बटनला क्लिक करा. यातील Academic Bank of Credits ID वर क्लिक केल्यानंतर Academic Bank of Credits ID तयार करण्यासंबंधित माहिती व PPT सादरीकरण आपणासाठी वेबसाइटवर उपलब्ध केलेले आहे.

४. विभागीय केंद्रे

(1)अमरावती : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे अमरावती विभागीय केंद्र,
व्ही.एम.व्ही. ते वलगाव रोड, पोस्ट व्ही.एम.व्ही.
अमरावती - 444 604
☎ : (0721) 2531445 / 2531210
फॅक्स : (0721) 2531444

(2)छत्रपती संभाजी नगर : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे औरंगाबाद विभागीय केंद्र
सर्व्हे नं. 41, सैनिकी मुलांच्या वसतिगृहाच्या पूर्वेस
नंदनवन कॉलनी, छावणी,औरंगाबाद - 431 002
☎: (0240) 2371077 / 2371066
फॅक्स : (0240) 2371088

(3)मुंबई : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे मुंबई विभागीय केंद्र
द्वारा : जगन्नाश शंकरशेठ म.न.पा.ची मराठी शाळा,
दुसरा मजला, फ्रेअर ब्रीज (साऊथ)
नाना चौक, ग्रँट रोड (प.), मुंबई - 400 007
☎: (022) 23874180 / 23874183 /
23874177 फॅक्स : (022) 23874187

(4)नागपूर : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नागपूर विभागीय केंद्र
रावबहादूर डी., लक्ष्मीनारायण बंगला
विद्यापीठ क्रीडा परिसर, लॉ कॉलेज कँपस
रविनगर चौक, नागपूर - 440 001
☎: (0712) 2553724 /25
फॅक्स : (0712) 2553725

(5)नाशिक : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नाशिक विभागीय केंद्र,
नाशिक महानगरपालिकेची जुनी इमारत, दुसरा मजला
नवीन पंडित कॉलनी, नाशिक -422 002
☎ : (0253) 2317063
फॅक्स : (0253) 2576756

(6)पुणे : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे पुणे विभागीय केंद्र
शाहीर अण्णाभाऊ साठे प्रशालागृह, महापालिका
शाळा क्र.5 (मुलांची), 654, सदाशिव पेठ
हौदासमोर, कुमठेकर मार्ग, पुणे -411 030
☎: (020)24457914 फॅक्स : (020) 24491107

(7) कोल्हापूर: य.च.म.मुक्त विद्यापीठाचे कोल्हापूर विभागीय केंद्र
शिवाजी विद्यापीठ परिसर पोस्ट ऑफीसजवळ
विद्यानगर, कोल्हापूर - 416 004
☎ : (0231) 2607022
फॅक्स : (0231) 2607023

(8) नांदेड : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नांदेड विभागीय केंद्र
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ क्रीडा इमारत
नांदेड - 421 606
☎ : (02462) 229940 / 283038
फॅक्स : (02462) 229950

५. अभ्यासकेंद्रे

शिक्षणक्रम : सहकार व्यवस्थापन पदविका

क्र.	*अभ्यासकेंद्र संकेतांक*	*अभ्यासकेंद्र*	*पत्ता*	*दूरध्वनी*
		अमरावती विभागीय केंद्र		
१.	१२८६अ	राष्ट्रीय सहकारिता विकास तथा ग्रामीण प्रबंधन संस्था	बालाजी प्लॉट, गोपालप्रभा मंगलकार्यालयासमोर अमरावती – ४४४ ६०१	(०७२१) २५७८५६३/ २५७८५५६ भ्रमणध्वनी – ९४२२१५६४२३
२.	११५३अ	**अकोला विभागीय केंद्र** नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पिपल्स एज्युकेशन अँड ट्रेनिंग फॉर सोसायटीज अँड वर्कस्	कृष्णाऊ, कीर्तीनगर, गोरक्षण रोड अकोला – ४४४ ००४	(०७२४) २४५९३९६
		मुंबई विभागीय केंद्र		
३.	३५३१५	जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय	मु. गोवेली, पो. रायते, ता. कल्याण जि. ठाणे	(०२५१) २३९०९२२
		पुणे विभागीय केंद्र		
४.	६२१६८	सुभाष भाऊराव कुळ महाविद्यालय	केडगाव, ता. दौंड, जि. पुणे ४१२ २०३	(०२११९) २२४५३४
५.	६२१८५	पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., भारत इंग्लिश स्कूल	दुसरा मजला, शिवाजीनगर पुणे – ४११ ००५	(०२०) २५५३०२०५
		नाशिक विभागीय केंद्र		
६.	५४१७७	नाशिक जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन	४, पहिला मजला, विश्वज्योती अपार्ट. हॉटेल प्रकाशच्या पाठीमागे, गोविंदनगर, नाशिक – ४२२ ००९	(०२५३) २४७११११
७.	५४३२७	व्ही.एन. नाईक शिक्षणसंस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,	डोंगरेवसतीगृह परिसर, कॅनडा कॉर्नर नाशिक–४२२००२	(०२५३) २५७६६९२
		कोल्हापूर विभागीय केंद्र		
८.	७१२५६	दिलासा सामाजिक विश्वस्त संस्था	'दिशा', एस.बी.आय.कॉलनी कोल्हापूर	९४२२०४३३९९

६. विशेष सूचना / संपर्कासाठी

(अ) अभ्यासकेंद्रासंबंधीच्या सूचना

०१. प्रवेशाची मुदत संपल्यानंतर संपर्कसत्रे केव्हा सुरू करण्यात येतील, त्यासंबंधी अभ्यासकेंद्रावर जाऊन वेळापत्रक पाहावे. ओळखपत्रावर अभ्यासकेंद्र प्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का घ्यावा. अभ्यासकेंद्रात येताना व परीक्षेच्या वेळी ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

०२. **मुदतीत प्रवेश घेणाऱ्यास अध्ययन साहित्य अभ्यासकेंद्रावर मिळेल.**

०३. विद्यापीठाशी आपण वेळोवेळी केलेला पत्रव्यवहार, फी भरल्याच्या पावत्या, बँकेतील चलन, इत्यादी कागदपत्रे जपून ठेवावीत. विद्यापीठ आपणास कायम नोंदणी क्रमांक (PRN = Permanent Registration Number) देते. प्रत्येक वेळेस पत्रव्यवहार करताना, अभ्याससाहित्य घेताना, परीक्षा देताना PRN लिहिणे आवश्यक आहे. PRN अभ्यासकेंद्रावरून मिळवावा.

०४. विद्यापीठाने स्थापन केलेल्या अभ्यासकेंद्राव्यतिरिक्त अन्य कोणत्याही खाजगी संस्था किंवा शिकवणी वर्गांना (क्लास) विद्यापीठाची मान्यता नाही. अशा संस्थेत किंवा **'क्लास' मध्ये प्रवेश घेतल्यास किंवा जादा शुल्क भरल्यास विद्यापीठ जबाबदार असणार नाही.**

०५. अभ्यासकेंद्राशी सतत संपर्क ठेवणे आपल्या हिताचे आहे. पत्रव्यवहाराद्वारे आपणास माहिती न मिळाल्यास केंद्रावर माहिती मिळू शकेल.

०६. विद्यापीठाने केलेल्या नियोजनाप्रमाणेच वर्गचाचणी आणि अंतिम परीक्षा अभ्यासकेंद्रावर घेण्यात येतात, त्यात बदल केला जात नाही.

०७. विद्यापीठाकडून गृहपाठ अभ्यासकेंद्रामार्फत दिले जातील. ते केवळ अभ्यासाच्या सरावासाठी आहेत. त्यांची उत्तरे लिहून पाहा. काही अडचणी असल्यास संबंधित अभ्यासक्रमाच्या मार्गदर्शक-अध्यापकांकडून मार्गदर्शन घ्यावे.

०८. अभ्यासकेंद्रावर पुरेशी विद्यार्थी नोंदणी झाली नसल्यास विद्यार्थ्यांना जवळच्या केंद्रावर संपर्कसत्र व परीक्षेस वर्ग (Transfer) करण्यात येईल.

(इ) विद्यापीठाचे मुख्यालय

'ज्ञानगंगोत्री परिसर', गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२.
दूरध्वनी क्र. (०२५३) २२३१७१४, २२३१७१५, २२३०२२७.

विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या नाशिक येथील कार्यालयात यावयाचे असेल तर अशोकस्तंभ बसस्टॉपवर सकाळी ९.३० व सायंकाळी ५.०० वाजता बसेस उपलब्ध आहेत. अशोकस्तंभ मध्यवर्ती बस (जुने सी.बी.एस.) स्थानकापासून जवळ आहे.

विद्यापीठ व विभागीय केंद्र यांच्या कार्यालयीन वेळा पुढीलप्रमाणे आहेत –

- सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.४५ (दुपारी १.३० ते २ सुटी)
- रविवार, प्रत्येक महिन्याचा पहिला व तिसरा शनिवार आणि शासकीय सुटीच्या दिवशी वरील कार्यालये बंद राहतील.

विशेष अडचणींबाबत संपर्क

१. माहितीपुस्तिका, अभ्यासकेंद्र अडचणी :
शिक्षणक्रम संयोजक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा
दूरध्वनी : (०२५३) २२३१४७७
विभागीय संचालक, विभागीय केंद्र

२. अभ्यासक्रम (विषय) यांतील अडचणी :
संचालक, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखा
दूरध्वनी – (०२५३) २२३१४७७

३. नोंदणी, नोंदणी क्रमांक, पत्ताबदल, केंद्रबदल :
उपकुलसचिव, नोंदणी कक्ष
दूरध्वनी –(०२५३) २२३०११८

४. परीक्षा, परीक्षा-अर्ज, परीक्षा क्रमांक , निकाल, पदवी प्रमाणपत्र, इत्यादी :
उपकुलसचिव, परीक्षा कक्ष, युनिट १
दूरध्वनी – (०२५३) २२३०७१६

५. अध्ययन-साहित्य, पुस्तके, कार्यपुस्तिका, ध्वनिफिती, चित्रफिती, ओळखपत्र, इत्यादी :
भांडार अधिकारी, भांडार व जावक कक्ष
दूरध्वनी – (०२५३) २२३०१०७

६. गृहपाठाबद्दल व स्थितीअभ्यासाबद्दल : माहितीसाठी
प्रमुख, मूल्यमापन केंद्र
दूरध्वनी – (०२५३) २२३००७३

७. अभ्यासकेंद्रासंदर्भात अडचणी
संचालक, विद्यार्थी सेवा विभाग
दूरध्वनी – (०२५३) २२३०२२९


परिशिष्ट १ : नोंदणी प्रक्रिया प्रवाहदर्शिका

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

Online Admission Process Flow for Candidate not having 16 Digit P.R.N.

16 अंकी P.R.N. नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया



Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

Online Admission Process Flow for Candidate who already have 16 Digit P.R.N.

ज्या विद्यार्थ्यांकडे 16 अंकी PRN आहे त्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया




From anywhere personally or with a help of MKCL center, Go to Digital University website. [कोठूनही स्वत: किंवा एमकेसीएल केंद्राच्या मदतीने विद्यापीठाच्या ycmou.digitaluniversity.ac या DU वेब-साईटवर जा.]




For Admission to second/third year, Click on "Online Application AY2015-16 for students having 16 digit PRN" link. [द्वितीय/तृतीय वर्षाला ऑनलाईन प्रवेश घेण्यासाठी, स्क्रीनवर दिसणाऱ्या 3 पैकी "Online Application AY2015-16 for students having 16 digit PRN" या लिंकवर क्लिक करा]




Login to your account. Use PRN as user ID and birth date as password. [PRN हा युझर आयडी व जन्म तारीख हा पासवर्ड म्हणून वापरून लॉगिन करा.]




To apply for admission, Click on link, "Admission to Second/Third year". [द्वितीय/तृतीय वर्षाला ऑनलाईन प्रवेश घेण्यासाठी, मेनूमधे स्क्रीन admission to Second/Third year या लिंकवर क्लिक करा.]




Student can change & select study center of choice, if S/he desires. [प्रस्तुत स्वेच्छेने बदलून, इच्छा असल्यास, विद्यार्थी सध्याचे अभ्यास केंद्र बदलू शकतो.]



Select medium of instruction and subjects. [अध्ययनाच्या भाषेची व विषयांची निवड येथे करा.]



Select fee category and fee details. [फी संवर्गाची योग्य पर्याय व तपशिलाची निवड येथे करा.]



Select payment mode (online or echalan) [फी बँकेत भरण्याच्या पर्यायाची (डेबिट क्रेडीट कार्ड द्वारे ऑन-लाईन या इ-चलनाने) निवड येथे करा.]




Pay admission fees online or Print eChalan and Pay Fees in bank next day. Print admission form. [ऑन-लाईन पद्धतीने अथवा चलनाची प्रिंट घेऊन बँकेत दुसऱ्या दिवशी फी भरा. प्रवेश अर्जाची प्रिंट घ्या.]



Everyday YCMOUs finance department will download (both online & echalan payment) MIS file from bank's website and upload it to DU website for auto-reconciliation of financial transactions. [विद्यापीठ दररोज बँकेच्या वेब-साईटवरील ऑनलाईन व इ-चलन आर्थिक देवाण घेवाण MIS फाईल डाऊन-लोड करून DU वेब-साईटवर आर्थिक जुळवणीसाठी उपलोड करील.]



YCMOU will verify fee category, fee paid, documents and approve/reject application online. [मुक्त विद्यापीठ, फी संवर्गाची योग्य निवड, पूर्ण फी भरल्याची खात्री करील व कागदपत्रांची ऑनलाईन तपासणी करून विद्यार्थ्यांचा अर्ज मंजूर/नामंजूर करतील.]



Student will be communicated accordingly by SMS. Student who's application is rejected can make correction either in fee category, pay balance fee online or by e-chalan and/or upload correct document. [प्रवेश-अर्ज मंजूर/नामंजूर झाल्याचा SMS विद्यार्थ्यास जाईल. प्रवेश-अर्ज नामंजूर झालेल्या विद्यार्थी, ऑन-लाईन पद्धतीने फी संवर्गातील चूक दुरुस्ती करून बँकेत ऑन-लाईन अथवा इ-चलनाने फी भरेल आणि/ अथवा योग्य कागदपत्र उपलोड करील.]



Student will get SMS when admission process is completed. S/he will submit application form with echalan copy to study center. Name and addresses of students with payment status approved, will be available online for dispatch of learning material. [प्रवेश-प्रक्रिया पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यास SMS येईल. विद्यार्थी इ-चलनासह प्रवेश अर्ज अभ्यासकेंद्रावर देईल. फी भरल्याची खात्री झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती अध्ययन साहित्य पाठविण्यासाठी ऑन-लाईन उपलब्ध होईल.]

परिशिष्ट २ : उमेदवार / अध्ययनार्थी करारनामा

उमेदवार / अध्ययनार्थी करारनामा

हा करार अध्ययनार्थी किंवा उमेदवार आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (यचममुवि) यांच्यामध्ये, अध्ययनार्थी / उमेदवार याने 'Accept' ह्या बटनावर क्लिक केल्यामुळे आपोआप अस्तित्वात आलेला आणि दोन्ही पक्षांना मान्य, कबूल आणि वैध असलेला मानण्यात येईल.

या करारनाम्यात 'उमेदवार' या संज्ञेचा वापर अशा व्यक्तींसाठी करण्यात आला आहे की जो यचममुविमार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमात प्रवेश घेऊ इच्छितो आणि 'अध्ययनार्थी ' या संज्ञेचा वापर अशा व्यक्तींसाठी करण्यात आलेला आहे, ज्या व्यक्तीने यचममुविमार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमास विहित पद्धतीचा अवलंब करून प्रवेश घेतला आहे.

उमेदवार असे मान्य व कबूल करितो की,

१) त्याने माहितीपुस्तिका तसेच संगणक पडद्यावर उपलब्ध असलेल्या मजकुराचा, माहितीचा, सूचनांचा व्यवस्थित पद्धतीने अभ्यास केला आहे आणि त्यानुसार योग्य त्या कृती केल्या आहेत.

२) त्याने ही खात्री करून घेतलेली आहे की, त्याने निवडलेल्या शिक्षणक्रमास तो पात्र आहे आणि जर तो माहितीपुस्तिका आणि / किंवा संगणक पडद्यावर उपलब्ध माहितीप्रमाणे अपात्र ठरत असेल तर त्याचा प्रवेश ताबडतोब रद्द करण्यात येईल आणि त्याने विद्यापीठात भरलेले शुल्क त्यास आंशिक किंवा पूर्ण स्वरूपात परत मिळणार नाही.

३) त्याने त्यास अध्ययन साहित्य (पुस्तके) कोणत्या स्वरूपात (छापील पुस्तके, इ–बुक, मोबाईल ॲप, दृकश्राव्य फिती, ध्वनिफिती सीडीवर किंवा इंटरनेटवर उपलब्ध असलेला मजकूर) उपलब्ध होणार आहे याची माहिती माहितीपुस्तिकेच्या संबंधित भागातून मिळविली आहे. आणि सदर स्वरूपात अध्ययन साहित्य उपलब्ध होणार आहे याबाबत त्याचे कोणतेही आक्षेप नाहीत आणि तो यापुढे कधीही अध्ययन साहित्य माहितीपुस्तिकेत दिलेल्या स्वरूपापेक्षा वेगळ्या स्वरूपात मिळण्याची मागणी करणार नाही.

४) तो यचममुवि संदर्भातील कोणतीही तक्रार किंवा इतर कोणतेही निवेदन त्यास सादर करावयाचे असल्यास अशी तक्रार किंवा निवेदन तो यचममुविमार्फत उपलब्ध असलेल्या संगणकीय प्रणालीचा (युजर आयडीचा) वापर करून करेल. अशी तक्रार किंवा निवेदन तो तक्रार किंवा निवेदनाचे उद्‌भवणाऱ्या कारणांच्या दिनांकाच्या तीस दिवसांच्या आत संगणकीय प्रणालीचा वापर करूनच करेल.

५) त्यास हे मान्य व कबूल आहे की, विद्यापीठाला शिक्षणक्रम राबविण्याच्या नियमांमध्ये, धोरणांमध्ये, अध्ययन साहित्यामध्ये, पाठ्यक्रमात बदल करण्याचा अधिकार आहे आणि अशा नियमांमधील धोरणांमधील, अध्ययन साहित्यामधील, पाठ्यक्रमामधील बदल त्यास बंधनकारक असतील आणि याबाबत त्याची कोणतीही तक्रार असणार नाही.

६) तो शिक्षणक्रमाच्या कालावधीमध्ये विद्यापीठात नोंदविलेल्या त्याच्या भ्रमणध्वनी क्रमांकात बदल करणार नाही.

७) त्यास हे मान्य व कबूल आहे की, त्याने नोंदणीच्या वेळेस विद्यापीठात सादर केलेल्या माहितीत बदल करणे (फोटोग्राफ, भ्रमणध्वनी क्रमांक, जन्मतारीख, पत्ता, इत्यादीसाठी) योग्य ते शुल्क आकारण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.

८) त्यास हे मान्य व कबूल आहे की, जर विद्यापीठास शासनाकडून (शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांसंदर्भात) त्याचे शुल्क प्राप्त झाले नाही तर अशा अध्ययनार्थ्यांना परीक्षा देण्यास मज्जाव करण्यात येईल आणि जर परीक्षा दिलेली असेल तर त्याचा निकाल तेव्हापर्यंत राखून ठेवण्यात येईल जेव्हापर्यंत त्याचे शुल्क विद्यापीठास प्राप्त होत नाही.

९) त्यास याचीही कल्पना आहे की, त्याच्याकडून कोणतीही असत्य, अपुरी माहिती दिली गेल्यास त्याचा प्रवेश रद्द करण्यात येईल आणि जर त्यास पदवी किंवा पदविका निर्गमित करण्यात आलेल्या असतील तर अशा प्रकारे असत्य, अपूर्ण माहिती मिळाल्याचे सिद्ध झाल्यानंतर त्याची पदवी, पदविका रद्दबातल करण्यात येईल.

१०) तो विद्यापीठाचे संकेतस्थळ (ycmou.digitaluniversity.ac. OR ycmou.ac.in) येथे नियमितपणे भेट देईल आणि तेथे देण्यात आलेल्या शैक्षणिक किंवा प्रशासकीय स्वरूपाच्या सूचनांचे (उदाहरणार्थ, परीक्षा हॉलतिकीट डाऊनलोड करणे आणि त्याची छपाई करणे) काटेकोरपणे पालन करेल.

११) तो विद्यापीठाच्या शिक्षणक्रमाचा अभ्यास अपेक्षित असलेल्या परिश्रम, शिस्त, प्रामाणिकपणे करेल. तसेच आपले वर्तन विद्यापीठाचा सुयोग्य अध्ययनार्थ्याप्रमाणे करेल आणि अशी कोणतीही कृती करणार नाही की जी विद्यापीठाच्या अध्ययनार्थ्यास शोभणार नाही.

परिशिष्ट २ : Candidate/Student Agreement at the time of Admission

Candidate/Student Agreement at the time of Admission

This is an agreement between the student or candidate and the YCMOU which is entered into by virtue of the candidate for admission clicking on "ACCEPT" button on the online admission portal at the time of admission to a program using online admission process.

In this agreement the term "candidate" is used to mean the person who proposes to take admission to a program in YCMOU and the term "student" is used to mean a person who has been admitted to a program of the YCMOU after fulfilling all the conditions thereof.

The candidate undertakes that -

1. He has gone through the prospectus and the on-screen narrations or directions and has sincerely responded to the on-screen directions.
